0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचा :-** १) या कार्यालयाचे दक्षता शाखेकडून दि.२०/१२/२०११ रोजी प्राप्त झालेला अहवाल.
२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.८७/२०११/जा.१०२५, दि. २१/१२/२०११.
३) उपनियंत्रक शिधावाटप, अ परिमंडळ, परेल यांचा दि.२२/१२/२०११ रोजीचा अहवाल.
४) मे. बिग बाजार यांचे दि.२३/१२/२०११ रोजीचे लेखी निवेदन.
५) मे. बिग बाजार यांचे दि.२६/१२/२०११ रोजीचे लेखी निवेदन.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.८७/२०११/जा. १०४३
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई - २०.
दिनांक : २९/१२/२०११.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

## आ दे श

**(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अवये)**

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

दिनांक १९/१२/२०११ रोजी या कार्यालयाच्या फिरते पथकातील अधिकारी/कर्मचारी यांनी पंचासह लोअर परेल, फिनीक्स मिल कंपाऊंड येथील बिग बाजार येथे अचानक भेट दिली असता, तेथे उपस्थित असलेले श्री. सुनिल मोहे, स्टोअर मॅनेजर, बिग बाजार यांचेकडे अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष कागदपत्रांची मागणी करुन उक्त ठिकाणा वरील अन्नधान्याची व खाद्यतेल साठ्याची मोजदाद करण्याचे काम सुरु केले. जीवनावश्यक वस्तूंच्या संपूर्ण साठ्याची पथकाने प्रत्यक्ष मोजदाद केली. तपासणीच्या वेळी आवश्यक असलेले कोणतेही परवाने तपासणीसाठी उपलब्ध करुन दिले नाही. तसेच परवाने संबंधी कामकाज पाहणारे बिग बाजारमधील श्री. मुरलीधर नायर हे उपस्थित नसल्याने संदर साठा परवान्या शिवाय विहित मर्यादे पेक्षा जास्त साठा केल्याचे निदर्शनास आल्याने बिग बाजारमध्ये हजर असलेले स्टोअर मॅनेजर श्री. सुनिल मोहे यांचा जबाब नोंदवून घेण्यात आला व त्यांनी श्री. मुरलीधर नायर हे हजर होताच आवश्यक कागदपत्र / परवाने सादर केले जातील असे पंचासमक्ष सांगितले. तसेच उपस्थित अधिकाऱ्यांनी सदरचा जीवनावश्यक वस्तूंचा साठा आहे त्या स्थितीत ठेवण्याबाबत सुचना देवून सदर साठ्याची विक्री केल्यास / नष्ट केल्यास जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ अंतर्गत कारवाई करण्यात येईल, याची त्यांना जाणीव करुन देण्यात आली. तसेच सदरचा साठा विनापरवाना असल्याचे सकृतदर्शनी दिसून

आल्याने खालील मुद्देमाल जप्त करण्यात येऊन तसा सुपूर्दनामा करुन श्री. सुनिल मोहे यांच्या ताब्यात देऊन पुढील आदेशापर्यंत जतन करण्याच्या सुचना दिल्या.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | तांदूळ | ५४.३५ क्विंटल | २,८२,६२०/- |
| २ | डाळी (एकत्रित) | ६३०८ किलो | ५,६७,७२०/- |
| ३ | खाद्यतेल | ६४५१ लिटर | ६,४५,१००/- |
| ४ | साखर | १७.३० क्विंटल | ६०,५५०/- |
| | | एकूण | १५,५५,९९०/- |

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप, अंमलबजावणी यांनी वरील वाचावे क्र.१ मध्ये नमूद केलेल्या अहवालान्वये केली आहे. त्यानुषंगाने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला जीवनावश्यक वस्तुंचा साठा सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दि. २६/१२/२०११ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक २६/१२/२०११ रोजीच्या सुनावणीस मे. बिग बाजार यांच्या वतीने श्री. सुनित साळगांवकर, व्यवस्थापक व श्री. संदिप खेडेकर, सहाय्यक व्यवस्थापक हे उपस्थित राहिले व त्यांनी वाचावे क्र. ४ व ५ अन्वये मे. बिग बाजार यांचे लेखी निवेदन सादर केले.

सबब, प्रकरण गुणवत्तेवर निर्णयासाठी राखून ठेवण्यात आले.

## युक्तिवाद :-

उपनियंत्रक शिधावाटप, अ परिमंडळ, परेल यांचे दिनांक २२/१२/२०११ रोजीच्या अहवालात, मे. बिग बाजार (पेन्टोलून रिटेल (इंडिया) लिमिटेडचा विभाग), हाय स्ट्रीट फिनिक्स, ४६२, फिनिक्स मिल कंपाऊंड, लोअर परेल, मुंबई ४०० ०१३ यांनी त्यांच्या कार्यालयास अन्नधान्य किरकोळ परवान्यासाठी दिनांक २३/०९/२००९ रोजी विहित नमुन्यातील अर्ज सादर केलेला असून त्यामध्ये त्यांनी साखर, तांदुळ, गहू, सर्व प्रकारच्या डाळी, खाद्यतेल/वनस्पती तसेच तेलबिया याकरिता परवान्यासाठी अर्ज सादर केलेला होता. सदर अर्जामध्ये असलेल्या त्रुटींची पूर्तता करण्याबाबत मे. बिग बाजार यांना वारंवार भ्रमणध्वनी वरुन संपर्क करुनही पूर्तता केलेली नसल्याने त्यांच्या कार्यालयाचे पत्र क्र. अप/अनुज्ञप्ती/प्र.क्र.१९७/०९/जा.४०८८, दिनांक २०/१०/२००९ अन्वये मे. बिग बाजार यांचा उपरोक्त अर्ज फेटाळल्याबाबत लेखी कळविण्यात येऊन दिनांक २३/१०/२००९ रोजी त्यांना सदरचे

पत्र मिळाल्याची पोच घेण्यात आलेली आहे. तद्नंतर मे. बिग बाजार यांनी आजतागायत त्यांच्या कार्यालयास संपर्क साधून कागदपत्रांची पूर्तता केलेली नाही, अथवा नव्याने अर्ज सादर केलेला नाही, असे नमूद केले आहे.

मे. बिग बाजार यांनी सादर केलेल्या लेखी निवेदनात, त्यांचे बिग बाजार हे स्टोर ४६२, सेनापती बापट मार्ग, लोअर परेल, मुंबई ४०० ०१३ या ठिकाणी अधिकाऱ्यांनी भेट देऊन जप्त करण्यात आलेल्या साठ्याच्या अनुषंगाने खुलासा सादर करीत असल्याचे सांगून त्यांनी शिधावाटप विभागाच्या परवान्याकरिता अर्ज केलेला होता. परंतू कागदपत्रांची पुर्तता न केल्याने त्यांच्या नविन परवान्याच्या अर्जाचा विचार करण्यात आलेला नाही. सदर परवाना प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांनी नव्याने अर्ज सादर केला असून परवाना प्राप्त होताच सादर केला जाईल असे सांगितले. ते किरकोळ व्यापारी असून त्यांचेकडे असलेल्या मोठ्या प्रमाणावरील ग्राहक वर्गाचे गरजा भागविण्याकरिता त्यांना सदर वस्तूंच्या साठवणूकीची गरज असते. त्यानुसार जप्त मुद्देमालामध्ये नमूद वस्तूंची साठवणूक केलेली असून त्यांचा साठेबाजीचा उद्देश नसल्याचे सांगून केवळ ग्राहकाच्या गरजा लक्षात घेऊन साठवणूक केलेली आहे. जप्त करण्यात आलेला साठा मुक्त करण्याची विनंती केल्याचे नमूद केले आहे.

मे. बिग बाजार यांनी सादर केलेल्या अलाहिदा निवेदनात, जप्त करण्यात आलेल्या साठ्यापैकी तांदूळचा साठा ५५ क्विंटल असून त्याकरिता विनापरवाना साठवणूकीचे कमाल मर्यादा १०० क्विंटल आहे. तसेच साखरेवरील निर्बंध नसल्याने तांदुळ व साखरेचा जप्त करण्यात आलेला साठा त्यांनी मुक्त करण्यास विनंती केल्याचे नमूद केले आहे.

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES OFFICE

**निष्कर्ष :-**

प्रस्तुत प्रकरणातील अपचारी, साठा मालक यांचा युक्तिवाद, निवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तूत प्रकरणी, दिनांक १९/१२/२०११ रोजी या कार्यालयाच्या फिरते पथकातील अधिकारी/कर्मचारी यांनी पंचासह लोअर परेल, फिनीक्स मिल कंपाऊंड येथील बिग बाजार येथे अचानक भेट दिली असता, तेथे उपस्थित असलेले श्री. सुनिल मोहे, स्टोअर मॅनेजर, बिग बाजार यांचेकडे अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष कागदपत्रांची मागणी करुन उक्त ठिकाणा वरील अन्नधान्याची व खाद्यतेल साठ्याची मोजदाद करण्याचे काम सुरु केले. जीवनावश्यक वस्तूंच्या संपूर्ण साठ्याची पथकाने प्रत्यक्ष मोजदाद केली. तपासणीच्या वेळी आवश्यक असलेले कोणतेही परवाने तपासणीसाठी उपलब्ध करुन दिले नाही. तसेच परवाने संबंधी कामकाज पाहणारे बिग बाजारमधील श्री. मुरलीधर नायर हे उपस्थित नसल्याने सदर साठा परवान्या शिवाय विहित मर्यादे पेक्षा जास्त साठा केल्याचे निदर्शनास आल्याने बिग बाजारमध्ये हजर असलेले स्टोअर मॅनेजर श्री. सुनिल मोहे यांचा जबाब नोंदवून घेण्यात आला व त्यांनी श्री. मुरलीधर नायर हे हजर होताच आवश्यक कागदपत्र / परवाने सादर केले जातील असे पंचासमक्ष

सांगितले. तसेच उपस्थित अधिकाऱ्यांनी सदरचा जीवनावश्यक वस्तूंचा साठा आहे त्या स्थितीत ठेवण्याबाबत सुचना देवून सदर साठ्याची विक्री केल्यास / नष्ट केल्यास जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ अंतर्गत कारवाई करण्यात येईल, याची त्यांना जाणीव करुन देण्यात आली. तसेच सदरचा साठा विनापरवाना असल्याचे सकृतदर्शनी दिसून आल्याने ५४.३५ क्विंटल तांदूळ, ६३०८ किलो डाळी (एकत्रित), ६४५१ लिटर खाद्यतेल व १७.३० क्विंटल साखरेचा साठा जप्त करण्यात येऊन तसा सुपूर्दनामा करुन श्री. सुनिल मोहे यांच्या ताब्यात देऊन पुढील आदेशापर्यंत जतन करण्याच्या सुचना दिल्या आहेत.

मे. बिग बाजार यांनी केलेल्या खुलाशात, त्यांचे बिग बाजार हे स्टोर ४६२, सेनापती बापट मार्ग, लोअर परेल, मुंबई ४०० ०१३ या ठिकाणी ते किरकोळ व्यापारी असून त्यांचेकडे असलेल्या मोठ्या प्रमाणावरील ग्राहक वर्गाचे गरजा भागविण्याकरिता त्यांना सदर वस्तूंच्या साठवणूकीची गरज असते. त्यानुसार जप्त मुद्देमालामध्ये नमूद वस्तूंची साठवणूक केलेली आहे. शिधावाटप विभागाच्या परवान्याकरिता त्यांनी केलेला अर्जाचा कागदपत्रांची पुर्तता न केल्याने विचार करण्यात आलेला नाही. उपरोक्त बाबी विचारात घेता मे. बिग बाजार यांना किरकोळ परवाना घेण्यास स्वारस्य नसल्याचे दिसुन येत आहे.

उपनियंत्रक शिधावाटप, अ परिमंडळ, परेल यांचे अहवालात, मे. बिग बाजार यांनी त्यांच्या कार्यालयास अन्नधान्य किरकोळ परवान्यासाठी दिनांक २३/०९/२००९ रोजी विहित नमुन्यातील अर्ज सादर केलेला असून त्यामध्ये त्यांनी साखर, तांदुळ, गहू, सर्व प्रकारच्या डाळी, खाद्यतेल/वनस्पती तसेच तेलबिया याकरिता परवान्यासाठी अर्ज सादर केलेला होता. सदर अर्जामध्ये असलेल्या त्रुटींची पूर्तता करण्याबाबत मे. बिग बाजार यांना वारंवार भ्रमणध्वनी वरुन संपर्क करुनही पूर्तता केलेली नसल्याने त्यांच्या कार्यालयाचे पत्र क्र. अप/अनुज्ञप्ती/ प्र.क्र.१९७/०९/जा.४०८८, दिनांक २०/१०/२००९ अन्वये मे. बिग बाजार यांचा उपरोक्त अर्ज फेटाळल्याबाबत लेखी कळविण्यात आले आहे. सदर बाब गंभीर असून मे. बिग बाजार यांनी नविन परवान्याकरीता सादर केलेल्या अर्जाची व त्याअनुषंगाने सादर करावयाच्या मुळ कागदपत्रांची मुदत संपल्याचे दिसुन येत आहे. यावरुन, स्टोर ४६२, सेनापती बापट मार्ग, लोअर परेल, मुंबई ४०० ०१३ या ठिकाणी जप्त करण्यात आलेल्या अनुसुचित वस्तूंचा साठा हा विनापरवाना साठवणूक केल्याचे निष्पन्न होत आहे.

केंद्रशासनाचे, ग्राहक बाबी, अन्न व सार्वजनीक वितरण मंत्रालय, नवी दिल्ली यांची अधिसुचना क्र. २२२७(अ) दि.२७/९/२०११ अन्वये डाळी/कडधान्य, खाद्यतेल व खाद्यतेलबिया यांच्या व्यापारावर दि.३०/९/२०१२ पर्यंत तसेच अधिसुचना क्र. २७१६(अ) दिनांक २९/११/२०११ अन्वये तांदळाच्या व्यापारावर दि.३०/११/२०१२ पर्यंत निर्बंध आणलेले आहेत. सबब, मे. बिग बाजार यांनी तांदुळ, डाळी/कडधान्य, खाद्यतेल या जीवनावश्यक वस्तूंच्या केलेल्या साठवणूकीकरिता त्यांना, दि महाराष्ट्र शेड्युल्ड कमोडिटिज रिटेल डिलर्स लायसन्सींग ऑर्डर १९७९ चे कलम ३ अन्वये अनुसुचित वस्तूंच्या साठवणूक व विक्री करिता किरकोळ परवाना घेणे क्रमप्राप्त आहे.

मे. बिग बाजार यांनी सादर केलेल्या अलाहिदा खुलाशात, जप्त करण्यात आलेल्या साठ्यापैकी तांदूळचा साठा ५५ क्विंटल असून त्याकरिता विनापरवाना साठवणूकीचे कमाल मर्यादा १०० क्विंटल आहे. तसेच साखरेवरील निर्बंध नसल्याने तांदुळ व साखरेचा जप्त करण्यात आलेला साठा त्यांनी मुक्त करण्यास विनंती केल्याचे नमूद केले आहे.

महाराष्ट्र डाळी, खाद्यतेल बिया आणि खादयतेल (साठा निर्बंध), आदेश, (सुधारणा) आदेश, २०१० अन्वये महानगरपालिका क्षेत्रात तांदूळ, डाळी/कडधान्य, खाद्यतेल/वनस्पती तसेच साखर यांच्या किरकोळ व्यापाऱ्यास तांदूळ - १०० क्विंटल, डाळी/कडधान्य - ५० क्विंटल, खाद्यतेल/वनस्पती - १५ क्विंटल तसेच साखर - १० क्विंटल पेक्षा जास्त साठवणूक केल्यास त्यांना किरकोळ परवाना घेणे आवश्यक आहे.

तथापी, मे. बिग बाजार यांचा तपासणीच्या वेळी जप्त करण्यात आलेला तांदळाचा साठा ५४.३५ क्विंटल असून तो वरील नमूद साठवणूकीच्या मर्यादेपेक्षा कमी आहे. तसेच केंद्रशासनाचे, ग्राहक बाबी, अन्न व सार्वजनीक वितरण मंत्रालय, नवी दिल्ली यांची अधिसुचना क्र. २२२७(अ) दिनांक २७/०९/२०११ अन्वये साखरेवरील निर्बंध दिनांक ३०/११/२०११ पर्यंत असून पुढील कालावधीसाठी केंद्र शासनाकडून निर्बंधाबाबत अधिसुचना प्राप्त झालेली नसल्याने दि.१९/१२/२०११ रोजीच्या तपासणीमध्ये जप्त करण्यात आलेल्या जीवनावश्यक वस्तूपैकी तांदळाचा व साखरेचा संपूर्ण साठा मुक्त करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

मे. बिग बाजार यांनी लोअर परेल, फिनीक्स मिल कंपाऊंड येथील नमुद ठिकाणी दि महाराष्ट्र शेडयुल्ड कमोडिटिज रिटेल डिलर्स लायसन्सींग ऑर्डर १९७९ चे कलम १४ अन्वये जप्त करण्यात आलेला खाद्यतेल व डाळी/कडधान्याचा साठा हा विनापरवाना साठवणूक केल्याने तसेच कलम ३ अन्वये साठवणूक व विक्री करिता परवाना घेतला नसल्याने त्यांनी दि महाराष्ट्र शेडयुल्ड कमोडिटिज रिटेल डिलर्स लायसन्सींग ऑर्डर १९७९ चे कलम ३, ४, ५, ६, ७, ८, ९ तसेच जिवनावश्यक वस्तु कायदा १९५५ या आदेशातील तरतूदींचा भंग केल्याचे निष्पन्न झाल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने, मे. बिग बाजार यांचा जप्त केलेला खाद्यतेल व डाळी (एकत्रित) यांचा संपूर्ण साठा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

**<u>आदेश :-</u>**

१) मे. बिग बाजार यांचा जप्त करण्यात आलेला तांदळाचा ५४.३५ क्विंटल व साखरेचा १७.३० क्विंटल साठा मुक्त करण्यात यावा.

२) मे. बिग बाजार यांचा जप्त करण्यात आलेला डाळी (एकत्रित) ६३०८ किलो व खाद्यतेल ६४५१ लिटर साठा शासनजमा करण्यात यावा.

३) सदर शासनजमा करण्यात आलेला संपूर्ण डाळी (एकत्रित) व खाद्यतेल यांचा साठा उपनियंत्रक शिधावाटप, अ परिमंडळ, परेल यांनी वैध परवानाधारकास प्रचलित दराने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची विल्हेवाट लावून येणारी रक्कम, उपनियंत्रक शिधावाटप, अ परिमंडळ, परेल यांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,
मे. बिग बाजार,
४६२, सेनापती बापट मार्ग,
लोअर परेल, मुंबई - १३.
(उपनियंत्रक शिधावाटप, अ परिमंडळ, परेल यांचे मार्फत)

प्रत,

१) उपनियंत्रक शिधावाटप, अ-परिमंडळ, परेल यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.
२) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई. यांना माहितीसाठी अग्रेषित.
३) कार्यासन अधिकारी, का.क्र.५, दक्षता शाखा, प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव अग्रेषित.
४) निवड नस्ती.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.